ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख १ जुलै, १९५३ | अंक २५

## विविध माहिती

**मॅलेंकाव्ह ह्यांची दिनचर्या**—एडवर्ड मरो नांवाच्या एका टेलिव्हनचे कार्यक्रम करणाऱ्या निर्मात्याला रशिआचे पंतप्रधान जॉर्जी मॅलेंकाव्ह ह्यांच्या जीवनांतील एका दिवसाच्या कार्यक्रमाचें चित्रण करण्याची परवानगी अमेरिकेच्या परराष्ट्र–खात्यानें आणि रशिआनें दिली असल्याचें समजतें. मात्र अमेरिकेच्या परराष्ट्र–खात्यानें चित्रपट प्रथम आपल्या अधिकाऱ्यांना दाखविण्यांत आला पाहिजे अशी अट घातली आहे.

**धार्मिक संस्थांना सवलत**—पंजाबमधील गुरुदासपूर येथील म्युनिसिपालिटीनें राज्य–सरकारला अशी विनंति केली होती कीं धार्मिक आणि धर्मादाय संस्थांकडून घरपट्टी वसूल करण्यांत घेऊं नये. राज्य–सरकारनें ही सवलत मंजूर केली आहे.

**लखनौ स्टेशनवर अन्नपूर्णा**—अ. भा. महिला अन्न–समितीनें लखनौ स्टेशनवर अन्नपूर्णा–गृह उघडावें अशी विनंति भारतीय रेल्वे–खात्यानें केली आहे. गृहासाठी स्टेशनवर एक खोलीहि देऊं करण्यांत आली आहे. रेल्वेस्टेशनवर अन्नपूर्णा–गृह उघडण्याचा हा पहिलाच प्रयोग असून तो १८ जुलैपासून सुरू करण्यांत येणार आहे. ह्या अन्नपूर्णा–गृहांत शिधापद्धति बाहेरील अन्नपदार्थ स्वस्त दरानें देण्यांत येतात.

**भारताची तिबेटला निर्यात वाढली**—गेल्या दोन वर्षांत भारतामधून तिबेटला होणाऱ्या निर्यातींत जवळ जवळ दुपटीनें वाढ झाली आहे. तिबेटहून येणाऱ्या आयातींत मात्र त्या प्रमाणांत वाढ झालेली नाहीं. भारत तिबेटला कापड, हस्तव्यवसायाच्या वस्तू व इतर उपभोग्य वस्तू पुरवतो.

**राजस्थानांत अभ्रकाचा कारखाना**—राजस्थान सरकारनें भिलवाडा येथें अभ्रक तयार करण्याचा कारखाना काढण्यास परवानगी दिली आहे. कारखाना चालू होण्यास आठ महिन्यांचा अवधी आहे. राजस्थानांत दरवर्षी १,४६,००० हंड्रेडवेट कच्चें अभ्रक पैदा होतें. त्याची किंमत सुमारें ८,००,००० रुपये भरते. १९५८ सालअखेर कारखान्यांत १०,००० मजूर उद्योगास लागतील.

**उत्तर प्रदेश सरकारला कर्ज**—उत्तर–प्रदेशांत २८० नव्या ट्यूब विहिरी खोदण्यासाठी भारतीय सरकारनें २ कोटी रुपये कर्ज देऊं केलें आहे असें समजतें. ही मदत लक्षांत घेऊन राज्य सरकारनें ९९५ ट्यूब विहिरी खोदण्याच्या कामाला आर्थिक मदत देण्याचें ठरविलें आहे.

**स्विट्झरलंडमधील बँका**—स्विट्झरलंड ह्या देशाची लोकसंख्या अवघी ४७ लाख आहे. पण लोकांना ४५० बँकांच्या सोयी उपलब्ध आहेत. शिवाय ९०२ सहकारी बँका आहेत, त्या निराळ्याच.

**भारतामधील भाताखालची जमीन**—१९५२–५३ ह्या सालीं भारतांत एकूण ७·४६ कोटी एकर जमिनींत भाताची लागवड करण्यांत आली होती. त्यापैकीं ५७ टक्के एकर जमीन बिहार, प. बंगाल, मद्रास आणि ओरिसा ह्या राज्यांत होती.

**टेलिफोनच्या तारांची निर्मिति**—प. बंगाल मधील रूपनारायणपूर ह्या ठिकाणीं टेलिफोनच्या तारा तयार करण्याचा कारखाना काढण्याचा विचार भारत सरकार करीत आहे. ह्या कामीं एका ब्रिटिश कंपनीचें सहकार्य घेण्यांत आलें आहे. येत्या तीन वर्षांत ह्या कारखान्यांत १२ कोटी रुपये भांडवल गुंतविण्यांत येईल. १९५३–५४ सालापासून प्रत्यक्ष उत्पादनास प्रारंभ होईल.

**जपानी पद्धतीची भातशेती**—उत्तर प्रदेशांतील आठ जिल्ह्यांत चालू हंगामांत ८०,००० एकर जमिनींत जपानी पद्धतीनें भातशेतीची लागवड करण्यांत आली आहे. भाताचीं रोपें तयार करण्यासाठीं ६१ एकरांचा वापर करण्यांत आला असून १२,००० एकर जमिनींत लावण्यासाठीं तीं पुरतील

**कातडी कमावण्याचीं केंद्रें**—उत्तरप्रदेश सरकारनें कातडी कमावण्याचें शिक्षण देण्यासाठीं राज्यांत सहा केंद्रें काढण्याचें ठरविलें आहे. ह्या केंद्रांमधून दरवर्षी १०० जणांना शिक्षण देण्यांत येणार आहे. कातडी कमावण्याचीं यंत्रेंहि बसविण्यांत आलीं आहेत. केंद्रें तीन ते चार वर्षें चालविण्यांत येतील.

**ग्रामोद्योगाच्या वस्तूंना बाजारपेठ**—भारतामधील ग्रामोद्योगाच्या वस्तूंना क्यूबा, सौदी अरेबिआ, सीलोन, इत्यादी देशांत चांगली बाजारपेठ आहे असें उत्तर प्रदेशाच्या ग्रामोद्योग खात्यानें जाहीर केलें आहे. सीलोनला जयपूरच्या लोकरीच्या गालिच्यांची जरूर आहे, सौदी अरेबिआला पायतणांची जरूर आहे आणि क्यूबाला जवसाचें तेल, लोकरीचें कापड, वगैरेंची जरूर आहे.

**मिठासाठी संशोधन–शाळा**—भावनगर येथें उघडण्यांत यावयाच्या मीठ–संशोधन केंद्रासाठी शहरांतील ताजमहाल हॉटेलची इमारत मुक्रर करण्यांत आली आहे. सौराष्ट्र-सरकारनें समुद्र-किनाऱ्यावरील ३० बिघे जमीन दिली आहे. भारतीय सरकारनें शाळेसाठीं ६० लाख रुपये बाजूला काढून ठेवले आहेत. १९५६ साल पर्यंत मिठाचें उत्पादन १० लाख टनांनीं वाढेल असा अंदाज आहे.

**पाकिस्तानासाठी ऑस्ट्रेलिअन मेंढ्या**—पाकिस्तान सरकार ऑस्ट्रेलिआंतून मेरिनो जातीच्या मेंढ्या आयात करणार आहे. पाकिस्तान मधील मेंढ्यांची अवलाद सुधारण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यांत येणार आहे. नवीन पैदाशीमुळें मेंढ्यांची लोकर वाढेल आणि लोकरीचा दर्जाहि सुधारेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

## वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा

चेअरमन, डॉ. मो. ना. आगाशे, ह्यांचे भाषण

(ता. २१-६-५३)

गतवर्षी सर्वसाधारण धंद्यांत मंदीची लाट येऊन भावांत चढउतार होत राहिल्यानें हेलकाव्याची परिस्थिति निर्माण झाली व जनतेच्या दृष्टीनें महागाई कमी झाली नाहीं. कांहीं भागांतून दुष्काळी परिस्थिति चालू होतीच. प्रतिकूल परिस्थितींतहि आपण १९५२ सालीं आपल्या कामांत १९५१ पेक्षा कांहीं थोडी अधिक वाढ करूं शकलों, ही अभिमानाची गोष्ट आहे. १९५१ मध्यें २ कोटी ६८ लाखांचे घरांत आपलें नवीन काम झालें तर तेंच १९५२ मध्यें मर्यादित खर्चांतच २ कोटी ६९ लाखांवर झालें आहे.

यापुढें विमाव्यवसायाच्या दृष्टीनें क्रांतिकारक असे बदल नजीकच्या भविष्य काळीं होतील असें वाटूं लागलें आहे. मानवी जीवनांत आर्थिक सुस्थिति निर्माण करण्याचे दृष्टीनें विम्याचें मोठें महत्त्व आहे, व म्हणूनच प्रत्येकाची बचतशक्ति अजमावण्याचें तें एक योग्य गमक असें म्हणतां येईल. १९५१ च्या सरकारी वार्षिक वृत्तांताचें या दृष्टीनें अवलोकन केल्यास एकंदर परिस्थिति आशादायक दिसत नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें. १९५१ मध्यें सर्व कंपन्यांचें मिळून एकूण नवीन काम कमी झालें हा मुद्दा गौण मानला तरी देशील एकंदर समाजाची बचत करण्याची शक्ति, वाढती महागाई व व्यापारांतील मंदी यांमुळें उत्तरोत्तर खालावत चालली असल्याचेंच स्पष्ट दिसतें. याचा दृश्य परिणाम म्हणजे बंद होत चाललेल्या विमा-पत्रकांचें वाढतें प्रमाण होय. पुष्कळ कंपन्यांच्या बाबत तर अवघ्या तीन-चार वर्षांतच मोठ्या प्रमाणावर मिळविलेलें नवीन काम बंद पडत चाललें आहे ही मोठी चिंताजनक गोष्ट आहे. भरमसाट खर्च करून विमा-धंदा वाढविण्याच्या प्रयत्नाचें कांहीं अंशीं हें फळ आहे असें म्हणतां येईल. सुदैवानें आपण अशा प्रकारच्या स्पर्धेस बळी पडलों नाहीं ही अभिमानाची व आनंदाची गोष्ट आहे. योग्य खर्चांतच टिकाऊ काम मिळविण्याची दक्षता आपण घेत आहोंत व पुढेंहि घेऊं व यामुळें चांगल्या कामाची थोडीफार भर जरी प्रतिवर्षी पडत राहिली तरीहि त्याबद्दल समाधान मानूं.

अखिल भारतामध्यें विमा-संरक्षण घेतलेल्या मंडळींची संख्या विचारांत घेतल्यास ती अत्यंत अल्प आहे असें दिसून येईल व त्या दृष्टीनें या धंद्याचे वाढीस भरपूर वाव आहे. सरकारहि आपल्या परीनें उत्तरोत्तर समाजाचें राहणीचें मान वाढावें, एतदर्थ नवीन योजना आंखीत आहे ही समाधानाची गोष्ट आहे. पंचवार्षिक योजना, नोकर-वर्गासाठी सरकारी विमा-योजना, प्रॉ. फंड कायदा या योगें विमा-धंद्यास पोषक वातावरण निर्माण होऊन विमा-क्षेत्रहि वाढण्यास मदत होणार आहे. त्याबरोबरच भारतीय लोकसभेपुढें असलेले वारसाहक विधेयक लौकरच मंजूर होऊन अमलांत येईल त्याचाहि विमा-धंद्याचे वाढीस उपयोग होईल.

परिस्थिति बिकट असूनहि १९५२ साल आपणांस वाढत्या यशाचें गेलें. या वर्षी आयुर्निधींत सुमारें ५५ लाखांपर्यंत भर पडली असून तो आतां पांच कोटी, साठ लाख रु. झाला आहे. त्याखेरीज सुमारें दोन लाख रुपये इन्व्हेस्टमेंट रिझर्व फंडाकडे वर्ग केले असून सदर फंड आतां पावणेपंचवीस लाखांपर्यंत झाला आहे व रोख्यांच्या बाजारभावानें येणाऱ्या किंमतींत जी घट दिसत आहे ती भरून काढण्यास सदर फंड पुरेसा आहे. ही एकूण वस्तुस्थिति कंपनीच्या भरभक्कम आर्थिक स्थैर्याची निदर्शक आहे १९५२ सालीं आपणांस आपले ठेवीवर एकूण व्याजाचा दर ४·२७ इतका पडला. १९५१ सालीं एकूण सर्व कंपन्यांचा ३·३० हा सरासरी पडलेला व्याजाचा दर पाहतां आपली कमाई निःसंशय प्रशंसनीय आहे असें म्हणावें लागेल. तसेंच सर्वसाधारणपणें १९५२ सालीं असलेलें खर्चाचें प्रमाणहि २३·८९ आहे; हें प्रमाण १९५१ सालचे सर्व कंपन्यांचे एकूण खर्चाचे सरासरी असलेले २६·८ या प्रमाणापेक्षा बरेंच कमी आहे.

या बाबतींत आपली स्थिति समाधानकारक असून सरकारनें घालून दिलेल्या मर्यादेचे आंतच आपलें खर्चाचें प्रमाण आहे. ह्या सर्व गोष्टी आपणांस उत्साहजनक व चांगलें भरीव काम मिळविणेच्या आपल्या परंपरेस धरूनच आहेत व त्याबद्दल आपणां सर्वांस अभिमान वाटणें स्वाभाविक आहे.

गतवर्षी विमेदार अगर त्यांचे वारस यांच्या कुटुंबांकडे २६ लाखांवर विम्याची रकम आपण पोहोंचविलेली आहे. अशीं कुटुंबें १७ शें वर आहेत; त्यांपैकी मुदत पूर्ण होऊन दिलेल्या क्लेमसूची संख्या चौदाशेंवर असून विमेदारांच्या मृत्यूमुळें देण्यांत आलेल्या क्लेमसूची संख्या ३५६ आहे. सन १९५२ मधील झालेल्या मृत्यु क्लेमसूची संख्या कमी आहे.

### जगांतील बोटींच्या संख्येंत वाढ

जगांतील बोटींची मोजदाद ठेवणाऱ्या लॉइड्स शिपिंग रजिस्टरची १९५२ ची आवृत्ति प्रसिद्ध झाली आहे. तीवरून असें दिसून येतें कीं बोटींच्या बांधणावळीच्या खर्चांत वाढ झालेली असून आणि पोलादाची टंचाई असतांना सुद्धां दर्यावर्दी राष्ट्रांपाशीं असलेल्या बोटींच्या संख्येंत वाढ झालेली आहे. १९५२ मध्यें जगांतील बोटींत २९,००,००० टन वजनाच्या बोटींची भर पडलेली आहे. डॉईजड कर आणि पोलादाची टंचाई असल्यामुळें कांहीं देशांत नवीन बोटी बांधण्याच्या मागण्या करण्यांत येत नाहींत; नाहींतर बोटींची संख्या आणखीहि वाढली असती. आज सर्व जगांत मिळून ९०·२ कोटी टन वजनाच्या बोटी आहेत. युद्धापूर्वीपेक्षा हें वजन ३० टक्क्यांनीं अधिक आहे. पण ह्या आकड्यांत अमेरिकेजवळील १२·५ कोटी टन वजनाच्या राखीव बोटीहि धरलेल्या आहेत. प्रत्यक्ष बोटींच्या संख्येंत युद्धपूर्व काळाच्या मानानें फक्त ६ टक्केच भर पडलेली आहे. ह्यावरून असें दिसतें कीं बोटींच्या आकारांत बरीच वाढ झालेली असावी. तेलवाहू बोटींच्या संख्येंत वाढ झाल्यामुळेंहि टन-वजनांत भर पडलेली आहे. अलीकडे जी टँकर्स बांधण्यांत आलीं अगर येत आहेत त्यांत १८,००० टन वजनाचीं कितीतरी आहेत. त्याशिवाय २० ते ३० हजार टन वजनाचीहि कांहीं बांधण्यांत आलीं आहेत. ह्यांहीपेक्षा अधिक वजनाचीं टँकर्स बांधलीं जात आहेत. खनिज धातूंची माती वाहून नेण्यासाठी वेगळ्या बोटी बांधण्याचीहि मागणी बोट-कंपन्यांकडून येत आहे. जगभर पोलादाची वाढती मागणी असल्यामुळें अशा बोटींना अधिक महत्त्व येत आहे. १९५२ सालीं २४,००० टन वजनाच्या दोन बोटी बांधण्यांत आल्या. त्यांचा उपयोग तेल अगर खनिज-माती वाहून नेण्यासाठी करतां येईल.

# अर्थ

बुधवार, ता. १ जुलै, १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे

## स्वातंत्र्योत्तर कालांतील उद्योगधंद्यांची कामगिरी

कलकत्ता येथील एम्प्लॉयर्स असोसिएशन ह्या संस्थेनें एक महत्त्वाची पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. '१९४७ ते ५२ मध्यें खाजगी उद्योगधंद्यांनीं बजाविलेली कामगिरी' असें तिचें नांव आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतरच्या वरील पांच वर्षांत खाजगी मालकीच्या उद्योगधंद्यांनीं देशाचा औद्योगिक पाया विस्तृत आणि बळकट करण्यासाठीं काय कार्य केलें, ह्यासंबंधींची माहिती सदर पुस्तिकेंत देण्यांत आली आहे. ह्या कालखंडांत खाजगी मालकीच्या प्रमुख उद्योगधंद्यांनीं केलेल्या कामगिरीचा तपशीलवार आढावा घेऊन नंतर ह्या उद्योगधंद्यांचा विकास करण्यासाठीं जरूर तीं साधनें पुरविण्यांत आलीं पाहिजेत असा आग्रह धरण्यांत आला आहे. असें झालें तरच देशाच्या आर्थिक जीवनांत त्या धंद्यांना आपला वांटा उचलतां येईल असेंहि सांगण्यांत आलें आहे. पुस्तिकेंत पुढील प्रमाणें माहिती देण्यांत आली आहे.

एंजिनिअरिंग आणि केमिकल्स ह्या उद्योगांत बऱ्याच बाबतींत स्वयंपूर्णता साधण्यांत आली आहे. एंजिनिअरिंगच्या धंद्यांत १९४६ च्या मानानें २९ टक्के उत्पादन-वाढ झाली असून केमिकल्सच्या व्यवसायांत १९३७ च्या मानानें ४० टक्के उत्पादन-वाढ झाली आहे. आहेत ते कारखाने कार्यक्षमतेनें चालविल्यामुळें आणि नवीन कारखाने काढले गेल्यामुळें ही उत्पादन-वाढ झाली आहे. एकंदरीनें उत्पादनांत वाढ झाल्यामुळें आयात कमी झाली असून तीवर होणारा परकीय हुंडणावळीचा खर्च वाचला आहे. १९२७-२८ सालीं भारतानें कापूस, कापड, सूत, साखर, पोलाद आणि सिमेंट ह्यांच्या आयातीवर ८० कोटी रुपये खर्च केले होते. आज मात्र ह्या वस्तूंच्या आयातीवर होणारा खर्च लक्षांत घेण्यासारखाहि नाहीं. आजच्या किंमती लक्षांत घेतल्या तर ह्या वस्तूंच्या आयातीवर होणारी ३०० कोटी रुपयांची परकीय हुंडणावळ वाचली आहे असा हिशेब होतो. कापसाच्या कापडाच्या बाबतींत तर भारतानें आयात थांबविली ऐवढेंच नसून, कापड मोठ्या प्रमाणावर निर्यात करणाऱ्या देशांच्या मालिकेंत स्थान पटकाविलें आहे. १९५०-५१ सालीं भारतानें १२७ कोटी वार कापड निर्यात केलें. हें कापड १३६·७१ कोटी रुपये किंमतीचें होतें. अजून पोलाद, कागद आणि इतर कांहीं वस्तू बऱ्याच प्रमाणांत आयात करण्यांत येतात हें खरें. पण ह्या बाबतींत एक गोष्ट अशी लक्षांत घेतली पाहिजे कीं, भारतीय उद्योगधंदे आहेत म्हणूनच आयात अधिक करावी लागत नाहीं.

१९४६ ते ५० ह्या कालांतील १३८ कंपन्यांचा अनुभव लक्षांत घेतां असें आढळून येतें कीं उद्योगधंद्यांनीं जुन्याच्या जागीं नवीं यंत्रें बसविणें, धंद्याचा विस्तार करणें, नवीन कारखाने काढणें आणि अधिक खेळतें भांडवल वापरणें ह्या कामीं वरील पांच वर्षांत जवळ जवळ ६२५ कोटी रुपये खर्च केले आहेत. १९४७ ते ५१ ह्या कालांत भारतामधील प्रमुख उद्योगधंद्यांनीं २,९०,००० अधिक कामगारांना रोजगार पुरविला. मळे आणि खाणी ह्यांचा समावेश वरील गणनेंत करण्यांत आलेला नाहीं. १९४७ ते ५१ च्या कालांत कामगारांच्या संख्येंत १४ टक्क्यांनीं वाढ झाली. त्याच कालांत २०० रुपयांपेक्षा कमी मासिक वेतन मिळविणाऱ्या कामगारांच्या एकूण पगारांत ४८ टक्के वाढ झालेली आहे. कामगारांना मिळणारी मोफत वैद्यकीय मदत आणि इतर सवलती ह्या वेगळ्या. दर महिना दोनशें रुपयांपेक्षा कमी पगार मिळविणाऱ्या कामगारांचा एकूण पगार ६५ कोटी रुपयांनीं वाढला आहे. त्यामुळें कामगारांच्या खऱ्या उत्पन्नांत वाढ झाली आहे. १९५१ च्या पहिल्या सहामाहींत ह्या गटांतील कामगारांचें सरासरी उत्पन्न १,०२४ रुपये होतें. १९४७ सालांतील सरासरीपेक्षा हें उत्पन्न ३९ टक्क्यांनीं अधिक आहे. ह्या कालांत मुंबई आणि कलकत्ता येथील कामगारांच्या रहाणीचे निर्देशांक अनुक्रमें १९ टक्क्यांनीं व २० टक्क्यांनीं वाढले आहेत असें दिसून येतें.

---

## त्रावणकोर येथील टिटॅनिअमचा कारखाना

त्रावणकोर येथें काढण्यांत आलेला टिटॅनिअमचा कारखाना जून १९५२ पासून बंद पडला होता. कारण, कारखान्यांत तयार होणाऱ्या मालाला पुरेशी मागणी नव्हती. टॅरिफ कमिशननें टिटॅनिअम ऑक्साईडची आयात करण्यांत भारत-सरकारनें बंदी करावी अशी शिफारस केली असून तिचा सरकारकडून स्वीकार झाल्यास कारखाना दोन-तीन महिन्यांत पुन्हा सुरू होण्याची शक्यता आहे. ह्या कारखान्यांत गुंतविण्यांत आलेल्या भांडवलापैकीं अधिकांश भाग त्रावणकोर-कोचीन सरकारचा आहे. परंतु टिटॅनिअम ऑक्साइड ज्यापासून तयार होतो त्या इलमेनाइट वाळूची मक्तेदारी मालकी मात्र भारत-सरकारची आहे. ह्या वाळूंतूनच ६० टक्के टिटॅनिअम ऑक्साइड निघतें. इलमेनाइट वाळूची विक्री एकाच दरानें देशी आणि परकीय कंपन्यांना करण्यांत येत असे. अर्थातच देशी कंपन्यांना परकीय कंपन्यांच्या स्पर्धेशीं टक्कर देतांना कठीण जाऊं लागलें. टॅरिफ कमिशननें भारत-सरकारला केलेल्या शिफारशी जर मान्य करण्यांत आल्या तर इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन कारखान्याला २०,००,००० रुपयांचें कर्ज देईल अशी अपेक्षा आहे. ह्या कर्जाला तारण म्हणून कारखान्याची मालमत्ता रहाणार आहे असें समजतें. सर्व मालमत्तेची मिळून किंमत ७५,००,००० रुपये आहे. त्रावणकोर-कोचीन मधील कारखाना दरवर्षी सुमारें १,८०० टन टिटॅनिअम ऑक्साइड तयार करूं शकेल इतकी त्याची उत्पादनक्षमता आहे. भारतामधील सर्व मागणी पुरवावयाची म्हटलें तरी सुद्धां कारखाना कमी पडणार नाहीं असें म्हणतात. सरकारनें पुरस्कारिलेल्या कारखान्यांना सुद्धां बाजारपेठांच्या मर्यादा कशा पाळाव्या लागतात आणि स्पर्धेत टिकून रहाण्यासाठी सवलती कशा मिळवाव्या लागतात ह्याचें एक उदाहरण म्हणून ही घटना लक्षांत ठेवण्यासारखी आहे.

## हिंदी चहाच्या धंद्याची दुःस्थिति

हिंदी चहाच्या मळ्यांची मालकी, अगदीं पूर्वी, शंभर टक्के युरोपियनांकडे होती. गेल्या शतकाच्या अखेरीनंतर पहिल्या महायुद्धापर्यंतच्या काळांत हिंदी मालकी वाढूं लागली. लहान मळ्यांच्या मालकांसहि चांगला फायदा सुटावा अशी परिस्थिति होती. मजुरी स्वस्त, नियंत्रणांचा अभाव, निश्चित बाजारपेठा, इत्यादि अनुकूल गोष्टींमुळें १५० एकरांचे लहान मळेहि फायदेशीर होत असत. हिंदी मळेवाल्यांचा चहाच्या धंद्यांत प्रवेश होण्यापूर्वी युरोपियन मळेवाल्यांचें बस्तान चांगलें बसलेलें होतें. मळ्यांच्या वाढीच्या काळांतहि हिंदी भांडवलाचें एकूण गुंतलेल्या भांडवलाशीं प्रमाण २५% वर गेलें नाहीं आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भांडवलाच्या मालकींत फारसा बदल झालेला नाहीं. हिंदी मळेवाल्यांवर आरोप करण्यांत येतो, कीं त्यांनीं चलतीच्या वेळीं गंगाजळी मजबूत केली नाहीं, त्यामुळेंच अडचणीचे वेळीं त्यांचेवर संकट आलें ह्याला हिंदी मळेवाल्यांचें उत्तर असें; कीं कांहीं अपवाद सोडले तर हिंदी मळेवाले प्रारंभापासून मोठे भांडवलदार नव्हते. मध्यमवर्गीयांची बचत गोळा करून लहान कंपन्या काढण्यांत आल्या व त्यांनीं मळ्याचा धंदा सुरू केला. मळ्यांचें क्षेत्र अगदी लहान होतें; भांडवलाच्या तुटवड्यामुळें त्यांना नवी यंत्रसामुग्री खरेदी करतां आली नाहीं. युरोपियन मळेवाल्यांनीं जुनी म्हणून त्याज्य ठरविलेल्या यंत्रसामुग्रीवर हिंदी मळेवाल्यांना समाधान मानावें लागलें, आपल्या लहान भांडवलास बँकांकडून व सावकारांकडून भारी व्याजाच्या दरानें कर्जे काढून जोड देणें त्यांना भाग पडलें. १९३३ च्या आंतरराष्ट्रीय चहाकरारान्वयें, त्यानंतरच्या काळांत चहाच्या मळ्यांचें क्षेत्र वाढविणें अशक्य झालें. युरोपियन व हिंदी व्यवस्थेखालील मळ्यांची तुलनात्मक कल्पना खालील तक्त्यावरून येईल. त्यांतील आकडे ईशान्य भारतांतील मळ्यांबाबत आहेत.

| | हिंदी व्यवस्थेखालील | युरोपियन व्यवस्थेखालील |
|---|---|---|
| मळ्यांची संख्या | ३६६ | ५७९ |
| त्यांचें क्षेत्र | ७४,०५३ एकर | ४,२१,२०८ एकर |
| मळ्याचें सरासरी क्षेत्र | २०२.३ एकर | ७२७.२ एकर |

युरोपियन मळेवाल्यांना सुमारें ७५ वर्षांचा सरकारी मदतीचा व औद्योगिक शांततेचा काळ मिळाला, तसा हिंदी मळेवाल्यांना मिळालेला नाहीं. इंडियन टी प्लँटर्स असोसिएशनमध्यें सामील असलेल्या ११२ हिंदी मळ्यांपैकीं फक्त २९ मळे पहिल्या युद्धापूर्वीचे आहेत आणि ६३ मळे १९१८ नंतरचे आहेत. १९३० च्या मंदीची झळ सहन करण्याची तेव्हां अस्तित्वांत असलेल्या मळ्यांत ताकद नव्हती व १९३३ च्या आंतरराष्ट्रीय चहाकरारानें त्यांची वाढ अशक्य करून टाकली. चहाच्या धंद्यांतील दुसऱ्या मंदीच्या आधींच्या काळांत मजुरांच्या मागण्या भरमसाट वाढलेल्या, मजूर संघ प्रभावी झालेले, चलनवाढीचे दुष्परिणाम, कच्च्या मालाचे किंमतींत ४००% वाढ, मजुरीचे दर वाढलेले, व्यवस्था खर्च वाढलेला, मालकांवरील आर्थिक जबाबदारी वाढलेली, संप, टाळेबंदी, करवाढ, वहातूक खर्चांत वाढ, नियंत्रणें, इत्यादींमुळें चहाच्या उत्पादनखर्चांत काटकसर करण्यास वावच उरला नाहीं. मजुरांचीकार्यक्षमता कमी झाली. उलट, धंदा चालू ठेवण्यासाठीं जादा भांडवलाची गरज मात्र वाढली. युद्धजन्य मागणी पुरी करण्यासाठीं आहेत त्याच मळ्यांचें उत्पादन वाढविण्यांत आलें, आणि मालाच्या दर्जाकडे दुर्लक्ष झालें. १९५१ च्या मध्यापर्यंत, म्हणजे चहास मोठी मागणी होती तोंवर, ही परिस्थिति टिकूं शकली. आतां मात्र चहाचें उत्पादन मागणीच्या मानानें फार पुढें जाऊन चहाची किंमत उतरली. चहाच्या दर्जास महत्त्व प्राप्त होऊन, मळेवाल्यांना त्याकडे लक्ष देणें भाग पडलें आहे; मग उत्पादन कमी झालें तरी चालेल. उत्पादनखर्चांतील बहुतेक बाबी लवचीक स्वरूपाच्या नसल्या कारणानें उत्पादनांतील घटीमुळें दर पौंडी उत्पादन-खर्चाचें पडणारें प्रमाण वाढलें. ह्या बदललेल्या परिस्थितींत ५०० एकरांखालील मळ्यांस किफायतशीर धंदा करणें अशक्यप्राय आहे; आणि बहुतेक हिंदी मळे ह्यापेक्षा लहानच आहेत. युरोपियन मळेवाल्यांसहि ह्या परिस्थितीचा तडाखा बसला आहे. परंतु त्यांची मूळ परिस्थिति अधिक चांगली होती. हिंदी मळेवाल्यांना पिकांच्या तारणावर कर्जें काढून धंदा करावा लागतो; आतां अशीं कर्जें मिळणें अवघड होत आहे.

इंडियन टी प्लँटर्स असोसिएशननें भारत सरकारकडे मदतीची मागणी केली आहे, ५०० एकरांचा प्रत्येक मळा करण्यासाठीं आणखी ६०,००० एकर जमीन चहाच्या लागवडीखालीं आणावी लागेल. त्यामुळें १५ वर्षांनीं, दरसाल ६ कोटी पौंड चहा ज्यास्त तयार होईल. ही वाढ भारताच्या सध्याच्या उत्पादनशक्तीच्या पेक्षा १०% ज्यास्त भरेल. हिंदी लोकांच्या राहाणीच्या मानांत अपेक्षित वाढ होऊन व प्रचाराच्या साहाय्यानें मागणी त्याप्रमाणांत सहज सुधारूं शकेल. परंतु, लहान मळ्यांच्या साहाय्यास सरकार आलें नाहीं तर त्यांचा सत्यनाश ठरलेलाच आहे. चहाच्या धंद्यांत मंदी येण्यापूर्वींच पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार झाल्यामुळें ह्या धंद्याचा उल्लेखहि त्या योजनेंत आढळत नाहीं. परंतु, चहाच्या धंद्याच्या भरभराटीचा बुडबुडा फुटला आहे आणि त्याचें सत्यस्वरूप उघड झालें आहे.

### बाँबे इन्शुअरन्स सोसायटी लि.

वरील संस्थेनें १९५२ मध्यें ८१.६६ लक्ष रुपयांचे ५,७१३ विमे स्वीकारले. १९५१ मध्यें तिनें ६४.९४ लक्ष रुपयांचे ४,७५६ विमे दिले होते. म्हणजे, कामांत सुमारें २५% वाढ झाली. एकूण चालू काम ४.५७ कोटि रुपयांचें आहे. लाइफ फंड १.१७ कोटि रुपये झाला आहे. डिसेंबर, १९५२ अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनाप्रमाणें सोसायटीच्या हिशेबांत ६.६३ लक्ष रु. वाढावा उरला व ती ११ रु. व ९ रु. प्रमाणें रिव्हर्शनरी बोनस देऊं शकली. व्याजाचा दर २.८७५% चा ३% पर्यंत वाढला. श्री. ए. एल. चंदावरकर हे सोसायटीचे चेअरमन असून श्री. व्ही. पी. वर्दे हे एक डायरेक्टर आहेत.

### कपाशीच्या जागतिक उत्पादनांत घट

१९५३–५४ मध्यें कपाशीचें जागतिक उत्पादन बरेंच घटेल, असा इंटर नॅशनल कॉटन अडव्हायसरी कमिटीचा अंदाज आहे. मध्यपूर्वेंतील देश व पाकिस्तान ह्यांत घट विशेष प्रमाणावर होईल. कारण तेथें धान्योत्पादनासाठीं अधिक क्षेत्राचा उपयोग केला जात आहे. कपाशीचा जागतिक साठा वाढला आहे आणि कपाशीची किंमत उतरली आहे. उत्पादनाच्या दृष्टीनें महत्त्वाचे देश अमेरिका ( १४९ लक्ष गाठी ), भारत ( २९ लक्ष गाठी ) व इजिप्त ( २० लक्ष गाठी ) हे होत.

### सिंद्री कारखान्याचा समाधानकारक नफा

सिंद्री फर्टिलायझर्स लि.ला ३१ मार्च, १९५३ अखेरच्या १४ महिन्यांच्या वर्षांत २ कोटि, ७१ लक्ष रु. ठोक व १ कोटि, ६० लक्ष रु. घसारा काढून १ कोटि, ११ लक्ष रु. निव्वळ नफा झाला. कारखान्याच्या उत्पादनशक्तीचे मानानें ५८% उत्पादन होऊनहि एवढा नफा झाला आहे. येत्या वर्षापासून कारखान्याचें वार्षिक उत्पादन ३,००,००० टनांवर जाईल.

## कर आणि बचत

लेखकः—श्री. व. वि. लोणकर, एम्. ए., बी. कॉम.

अनिर्बंध आर्थिक व्यवस्थेमध्यें बचतीला आर्थिक विकासाच्या दृष्टीनें सर्वांत जास्त महत्त्व आहे. देशांत दरसाल जितकी बचत होत जाईल तितक्याच प्रमाणांत उत्पादनाचीं साधनें उपलब्ध होत जातील. तेव्हां अर्थवृक्षाचें बचत हें मूळ होय आणि पुढें या वृक्षाचा पुरेपूर विस्तार होऊन त्याचीं आर्थिक स्वास्थ्याचीं गोड फळें समाजाला चाखावयाचीं असलीं तर प्रथमपासूनच बचत या मुळाची उत्कृष्ट जोपासना करावयास हवी. चालू युगांत अनिर्बंधतेचें आर्थिक धोरण मागें पडत चाललेलें असलें आणि राज्यप्रणिततेला जास्त महत्त्व दिलें जात असलें तरी निदान या देशांत तरी खाजगी प्रयत्न आणि राज्य प्रयत्न या दोन्हीं तत्त्वांना प्रसंगोचित वाव दिला जाणार आहे, असें राज्यकर्त्यांनीं वारंवार घोषित केलें आहे.

अर्थात्च बचत करण्याची जबाबदारी खाजगी व्यक्ति आणि सरकार यांत विभागली जाणार आहे. खाजगी बचत दरसाल किती होत राहील हें व्यक्तींच्या उत्पन्नाच्या मानानें ठरेल. कोठल्याहि व्यक्तीच्या उत्पन्नाचे वांटेकरी दैनंदिन गरजा ( स्वतःच्या आणि अवलंबितांच्या ) हे प्रथम होतात, तरी पण चरितार्थ चालवितांना सरकारी आणि निमसरकारी करभरणी तितकीच अपरिहार्य राहते. म्हणजे कर भरल्याशिवाय व्यक्तीला जगतांच येत नाहीं. हे वांटेकरी भागविल्यावर राहील ती बचत. ही बचत निरनिराळ्या मार्गांनीं एकत्रित होऊन समाजाला हवे असलेले आणि फायदा देणारे उद्योगधंदे उत्पन्न होतात.

राज्यप्रणित उद्योगधंदे काढावयाचे त्यालाहि बचतीची जरूर आहेच. ही अर्थात्च राज्यशासकांच्या वार्षिक उत्पन्नांतून शासनाचा वार्षिक खर्च वजा जातां शिल्लक राहील ती. आजवर जोंपर्यंत उद्योगधंदे काढण्याची सरकारवर जबाबदारी नव्हती तोंपर्यंत वार्षिक अंदाजपत्रकांत शिल्लक दाखविण्याचें कारणच पडत नव्हतें. इतकेंच नव्हे तर मामुली शिलकीच्या पलीकडे आणखी वाढती शिल्लक काढणें म्हणजे जनतेवर विनाकारण करांचा बोजा ठेवल्यासारखें झालें असतें. आतां सरकारनें नवे उद्योग अंगिकारावयाचे अथवा चालू खाजगी उद्योगांना स्वतःच्या शिलकींतून मदत करावयाची तर कर वाढवणें जरूर पडतें.

सरकार नवे कोणते उद्योग काढणार, तर ज्या कांहीं ऐतिहासिक कारणांनीं देशांत विशिष्ट उद्योग निघूं शकले नाहींत अथवा ज्यांना लागणारें भांडवल फारच प्रचंड असतें इतकें कीं जें तुरळक व्यक्तींच्या बचतींतून उभें राहण्यासारखें नसतें. अशा प्रकारचे हे उद्योग अंगिकारतांना अर्थात्च त्यांची जरूरी आहेच आहे हें सरकार प्रथम ठरवतें. मग त्यांतून नफा फारसा होवो न होवो.

सरकार ज्या बचतीचा उपयोग करणार ती अर्थात्च जनतेच्या खिशांतून येणार. आणि तो पैसा जनतेच्या उत्पन्नांतून ज्या बेतांत सरकारनें औद्योगिक वेळापत्रक काढलें असेल त्या प्रमाणांत घेतला जाणारच जाणार. म्हणजे राज्यप्रणित औद्योगिक विकास हा जनतेनें स्वेच्छेनें केलेल्या बचतींतून होत नसून त्याला थोडेंबहुत वेठीचें स्वरूप येतें. विशिष्ट उद्योगाची देशाला जर गरज आहे असें ठरलें तर जनतेनें तेवढा स्वार्थत्याग केलाच पाहिजे. देशांत खाजगी उद्योग चालू आहेतच, नवीन निघणार आहेतच, त्यालाहि जनतेनें बचतीचा पुरवठा चालू ठेवला पाहिजे. म्हणजे जनतेच्या बचतशक्तीवर आतां दुहेरी ताण पडणार आहे. राज्यकर्त्यांकरतां कराव्या लागणाऱ्या बचतीला विकल्प नाहीं. म्हणजे वाढलेले कर भरले नाहींत तर सरकारी दंडुका पाठीवर आहेच. तेव्हां सध्यांच्या दुहेरी ( खाजगी आणि राज्यप्रणित )


# —वेस्टर्न इंडियाचें—

## यशस्वी कार्य

१९५१ साल मंदीचें असतांहि भरीव काम व निश्चित प्रगति करून आपली उज्ज्वल परंपरा वेस्टर्न इंडियानें कायम राखली

## १९५२ मधील कांहीं वैशिष्ट्यें

एकूण नवीन काम रु. २ कोटी ७० लाखावर | एकूण चालू काम रु. १८॥ कोटीवर
एकूण हप्त्यांची आवक रु. ८९ लाखावर | एकूण आयुर्निधि रु. ५॥ कोटीवर
एकूण क्लेम्स दिले रु. २ कोटीवर

## दर हजारीं आकर्षक त्रैवार्षिक बोनस

हयातींतील विमा रु. २७/– | हयातीनंतरचा विमा रु. २३/–

हप्त्याचे दर पूर्वीचेच अत्यंत माफक. आपला विमा व प्रतिनिधित्वासाठीं एक सर्वोत्कृष्ट आदर्श विमासंस्था

—सविस्तर माहितीसाठीं लिहा वा भेटा—

: मॅनेजर :

वेस्टर्न इंडिया विमा कंपनी लि., सातारा.

शाखा कार्यालय १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २ फो. नं. ३४०१

व्यवस्थेत कालांतरानें खाजगी औद्योगिक विकास बचतीला सरकारी ओढ लागल्यामुळें आणि खाजगीकडे जाणारा तेवढा बचतीचा ओघ आटूं लागल्यामुळें, निश्चितपणें मागें पडत जाऊन कदाचित् नामशेषहि होईल.

याचा दुसरा परिणाम जनतेच्या राहणीवर झाल्याशिवाय राहणार नाहीं. जनतेच्या जेवढ्या गरजा 'गरजा' म्हणून सरकार मान्य करील तेवढ्याच भागविल्या जातील. आणि अशा सार्वदेशिक 'गरजा' भागविण्याकरतां करावा लागणारा खटाटोप येवढा प्रचंड असेल कीं, ज्याला आपण 'सुखवस्तुत्व' अथवा 'स्वास्थ्य' अथवा 'आराम' म्हणतो त्याला पूर्णविराम मिळेल.

---

## प्रांतिक सहकारी मार्केटिंग सोसायटी

### डायरेक्टरांच्या बडतर्फीचें हायकोर्टांतील प्रकरण

मुंबई प्रांतिक सहकारी मार्केटिंग सोसायटीच्या कारभारांत बरेच दोष निदर्शनास आले आहेत. भारत सरकारकडून मुंबई राज्यसरकारला अमोनियम सल्फेटचें जें वाटप मिळतें, तें प्रत्यक्ष घेऊन शेतकऱ्यांना पोंचविण्याचें काम ह्या सोसायटीकडे आहे. त्या कामांत घोटाळे झाल्याचें सरकारच्या निदर्शनास आलें आणि सोसायटीची जिंदगी बुडीत व संशयित येण्यामुळें फार कमी झाली, असेंहि सरकारला दिसून आलें. सरकारनें पूर्ण चौकशीअंतीं श्री. अशोक हिरालाल काजी (चेअरमन), श्री. एस्. आर्. पाटील व श्री. एच्. एस्. कानविंदे ह्यांना १९ जून, १९५२ पासून डायरेक्टरांचे जागेवरून दूर केलें. स्पेशल ऑडिटरच्या रिपोर्टावरून सरकारनें बॉंबे को. सोसायटीज रूल्समधील ४८ व्या कलमान्वयें फडतर्फीचा हा हुकूम काढला. हे तिघे सोसायटींत आढळलेल्या दोषांस कारणीभूत आहेत; त्यांनीं आपल्या स्थानाचा दुरुपयोग केला व सोसायटीचें हित पाहिलें नाहीं, असें सरकारचें म्हणणें आहे व त्याच्या मतें हे तिघे सोसायटीचे डायरेक्टर रहाण्यास पात्र नाहींत असें सरकारनें कारण दिलें. त्या जागीं सरकारनें श्री. व्ही. पी. वर्दे (मुंबई), श्री. डी. व्ही. पोतदार (पुणें) व श्री. आर. व्ही. बंडेकर (नाशिक) ह्यांची नेमणूक केली.

बुधवार, ता. २४ रोजीं, काढून टाकलेल्या तिघांपैकीं श्री. काजी व श्री. कानविंदे ह्यांनीं मुंबई हायकोर्टांत अर्ज करून, त्यांच्या जागीं नेमलेल्या डायरेक्टरांना डायरेक्टरची जागा देण्यास प्रतिबंध करणारा तात्पुरता हुकूम (इंटेरिम ऑर्डर) मागितला. त्यांचा अर्ज दाखल करण्यांत आला. सरकारी हुकूम हा दुर्भावपूर्वक होता व तो रद्द करण्यांत यावा असा हुकूम हायकोर्टानें करावा, अशीहि अर्जदारांची विनंति होती.

### अर्जदार डायरेक्टरांचें म्हणणें

"आकस्मिक आवश्यकतेची परिस्थिति नसेल तर सरकारनें अर्जदारांना "असा हुकूम का काढण्यांत येऊं नये ह्याचीं कारणें दाखविण्यास संधि देणें" जरूर होतें. आकस्मिक आवश्यकता निर्माण झाली हें सरकारचें म्हणणें चुकीचें आहे, कारण ऑडिटरचा रिपोर्ट सरकारजवळ मार्च, १९५२ पासून म्हणजे १५ महिने आहे. अर्जदार-डायरेक्टरांचा विरोध नष्ट करणें, एवढाच प्रस्तुत हुकुमाचा उद्देश आहे. अर्जदारांनीं त्यांचीं कर्तव्यें दक्षतेनें पार पाडलीं आहेत. सहकारी खात्याच्या रजिस्ट्रारची त्यांचेबद्दल अदावत होती. गेल्या जानेवारींत श्री. काजी हे चेअरमनचे जागीं निवडून आले. डेव्हलपमेंट खात्याचे सेक्रेटरी व रजिस्ट्रार ह्या दोघांनीं श्री. काजी ह्यांना चेअरमनची जागा श्री. जी. जी. मुरारजी ह्यांचेसाठी सोडून देण्याची विनंति केली, तिला श्री. काजी बळी पडले नाहींत व त्यामुळें त्यांचा दुर्भाव अधिकच वाढला. डायरेक्टरांना काढून टाकणाऱ्या सरकारी हुकुमाच्या बुडाशीं दुष्टबुद्धि होती, हें वरवर पहातांहि दिसून येतें. १९५०-५१ च्या रिपोर्टांत अनियमिता दाखविण्यांत आली, तिच्याशीं श्री. कानविंदे ह्यांचा संबंध पोंचूंच शकणार नाहीं, कारण ते त्या मुदतींत डायरेक्टर नव्हतेच."

अर्जदारांनीं सरकारचा हुकूम रद्द करावा, अशी विनंति केली ती हायकोर्टानें मान्य केली तर त्याचा अर्थ त्यांना अध्यक्ष व डायरेक्टर म्हणून पुनः पूर्वीच्या जागेवर प्रस्थापित केल्यासारखें होईल, असें हायकोर्टानें निदर्शनास आणलें. तेव्हां, अर्जाचा विचार होईपर्यंत नव्या डायरेक्टरांना त्यांच्या जागीं येण्यास मनाई करावी, अशी अर्जदारांतर्फे विनंति करण्यांत आली.

श्री. काजी व श्री. कानविंदे ह्यांच्या अर्जाचा हायकोर्टानें विचार करून श्री. वर्दे, श्री. पोतदार व श्री. बंडेकर ह्या तिघा सरकारनियुक्त नव्या डायरेक्टरांनीं डायरेक्टर म्हणून काम करूं नये, असा आदेश दिला. अर्जदारांची मागणी, सरकारला १७ जूनच्या हुकुमाची अंमलबजावणी करतां येऊं नये व नव्या डायरेक्टरांना जागेचा चार्ज घेतां येऊं नये, अशी होती. अर्जाचा विचार चालू आहे तोंवर सरकार हुकुमाची अंमलबजावणी करणार नाहीं अशी ॲडव्होकेट जनरलनें हमी दिली, म्हणून त्याबाबत हायकोर्टानें हुकूम केला नाहीं. परंतु, नव्या डायरेक्टरांचे वतीनें ॲडव्होकेट जनरलला हमी देतां येणें शक्य नव्हतें. कारण ते जरी सरकारनें नेमले होते तरी नेमणुकीनंतर त्यांना स्वतंत्र अधिकार प्राप्त झालेले होते. म्हणून, हायकोर्टानें इंटेरिम हुकूम दिला व मूळ अर्जाच्या चौकशीसाठी २२ जुलै ही तारीख नेमली.

---

## अमेरिकन भांडवल परदेशांत गुंतविण्यासाठी प्रोत्साहनाची आवश्यकता

### उद्योगपतींच्या अटी

ज्यास्त अमेरिकनांना परदेशांत पैसा गुंतविण्यास प्रोत्साहन कसें वाटेल, ह्यावर पंधरा प्रमुख अमेरिकन उद्योगपती तेथील सरकारास एक अहवाल सादर करणार आहेत. अमेरिकन सरकारच्या सूचनेवरूनच ते प्रस्तुत सल्ला देणार आहेत. (१) देशाबाहेर पैसा गुंतविणारांना स्वदेशांत इन्कमटॅक्सचे बाबतींत सवलत मिळावी, (२) त्यांनीं परदेशांत गुंतविलेल्या रकमांच्या मिळकतीचें डॉलरमध्यें रूपांतर करतां येईल आणि ती अमेरिकेंत नेता येईल, अशी परदेशांनीं हमी द्यावी आणि (३) परदेशांत वाढविलेल्या व्यवसायाचें अपहरण, राष्ट्रीयीकरण किंवा अन्य तऱ्हेनें ग्रहण केलें जाणार नाहीं अशी परदेशांची हमी मिळावी अशा तीन मोठ्यांचीं अमेरिकन उद्योगपतींना खात्री वाटावयास हवी आहे. परदेशांत पैसे गुंतविणारांना अमेरिकेकडून प्रारंभीं मदतहि लागेल; कारण परदेशांनीं वहातुक, दळणवळण व व्यापारविषयक सोई सुधारल्याविना व्यवसाय वाढीस लागणें कठीण जाईल. प्रस्तुत पंधरा उद्योगपतींत पॉल हॉफमन (स्टुडबेकर कॉर्पोरेशनचे अध्यक्ष), वॉन ट्रिप (पॅन अमेरिकन एअरवेजचे अध्यक्ष), जॉन मॅक्लॉय (चेस नॅशनल बँकेचे अध्यक्ष), एरिक जॉनसन (मोशन-पिक्चर असोसिएशन ऑफ अमेरिकेचे अध्यक्ष), इत्यादि नांवें आहेत.

## आयातीबद्दलचें जुलै-डिसेंबरचें धोरण

येत्या जुलै ते डिसेंबर १९५२ या सहा महिन्यांसाठी आयाती-बद्दलचें धोरण ता. २४ जून रोजीं दिल्लीहून जाहीर झालें असून हें धोरण कारखानदार व व्यापारी यांच्या दृष्टीनें बरेंच समाधान-कारक आहे. गिऱ्हाइकाच्या दृष्टीनेंहि, कित्येक नवीन वस्तूंची आयात करण्यांत येणार असल्यामुळें, हें धोरण फायदेशीर आहे. परवान्याची फी किमान २५० रु. वरून १०० रु. वर आणून छोट्या आयात व्यापाऱ्यांना सवलत देण्यांत आली आहे.

यंत्रसामुग्री व उद्योगधंद्यांना आवश्यक कच्च्या मालाला आयातीचे बाबतींत पूर्वीप्रमाणेंच अग्रहक्क कायम आहे. आवश्यक उपभोग्य मालाच्या आयातीच्या बाबतींत अल्प प्रमाणांत परवानगी देण्यांत आली आहे. देशी उद्योगधंद्याच्या दृष्टीनें जो माल पुरेशा प्रमाणांत देशांत तयार होतो त्याच्या आयातींत कपात करण्यांत आली आहे. विणकर लोकांच्या दृष्टीनें रेशीम व कापसाचें तलम सूत याच्या आयातीला परवानगी देण्यांत आली आहे. रेफ्रिजरेटर्स व टाइपरायटर्स या वस्तूंची डॉलर विभागांतून आयात करावयास परवानगी देण्यांत आली आहे. यावरून डॉलरची चणचण आतां पूर्वीइतकी भासत नाहीं असें दिसून येतें. दुधाचे डबे, घड्याळें व लोंकर यांहि वस्तूंच्या अधिक आयातीला परवानगी देण्यांत आली आहे. नवीन आयात धोरणामुळें १० कोटी रु. किंमतीचा जास्त माल आयात होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

हिंदच्या परराष्ट्रीय व्यापाराच्या बाबतींत आतां एक निश्चित धोरण स्थिर होण्याच्या मार्गावर आहे व आयात-व्यापाराचा प्रश्न आतां कठिण उरलेला नाहीं. खरेदीदारांची बाजारपेठ सुरू झाली असल्याचा हा एक निश्चित परिणाम आहे. हिंदमधील वस्तूंचा अंतर्गत पुरवठा आतां समाधानकारक बनला आहे व यंत्रसामुग्री आणि कांहीं उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल या दोन बाबी वगळल्यास इतर पुष्कळशा बाबतींतील आयात ही श्रीमंत गिऱ्हाइकाच्या गरजा भागविण्यासाठी किंवा देशांत तयार होणाऱ्या मालाला पूरक म्हणून किंवा देशी कारखानदारांनीं मालाची किंमत व दर्जा यांच्याकडे लक्ष पुरवावें या गोष्टींच्या दृष्टीनें करण्यांत येत आहे. आतां निर्गत वाढविण्यावर विशेष रीतींनें भर दिला पाहिजे हें स्पष्ट झालें आहे. व्यापार-मंत्री श्री. करमरकर यांच्याकडे निर्गतीच्या वाढीकडे विशेष रीतीनें लक्ष देण्याचें काम नुकतेंच सुपूर्त करण्यांत आलें आहे.

अखिल भारतीय आयात करणारांच्या संघाचे अध्यक्ष श्री. शांतिलाल शहा यांनीं पत्रक काढून आयात-विषयक धोरणाचें स्वागत केलें आहे. त्यांच्या मतें उद्योगधंदे, व्यापारी व गिऱ्हाईक या तिघांच्या, कांहीं बाबतींत परस्पर हितविरुद्ध असणाऱ्या संबंधांच्या बाबतींत, नवीन आयातविषयक धोरणामुळें शक्य तितकी एकवाक्यता निर्माण करण्याचा प्रयत्न झाला आहे.

---

### दि ॲग्रिकल्चरल् प्रोड्यूस मार्केट कमिटी, सांगली

सांगली-मिरज रस्त्यावरील मार्केट यार्डचे नवीन जागेवर मार्केट कमिटीचे ऑफिसचा कोनशिला बसविणेचा समारंभ श्री. पां. ज. चिन्मुळगुंद, आय्. सी. एस्., रजिस्ट्रार, को-ऑपरेटिव्ह सोसायटीज् व डायरेक्टर, ॲग्रिकल्चरल मार्केटिंग व रूरल फायनान्स, मुंबई राज्य पुणें, यांचे हस्तें बुधवार ता. १ जुलै १९५२ रोजीं सकाळीं १०-४७ वाजतां होणार आहे.

### लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालयास अर्थ-मंत्री श्री. देशमुख यांची भेट

औद्योगिक संग्रहालयास भारत सरकारचे अर्थ-मंत्री श्री. चिंतामणराव देशमुख व सौ. दुर्गाबाई देशमुख यांची भेट ता. २३-५-५२ मंगळवारीं झाली. संग्रहालय पाहण्यांत त्यांनीं दोड तासाचे वर वेळ खर्च केला. दोघांहि निमंत्रितांनीं बारकाईनें संस्थेंतील विविध प्रदर्शनांची व कार्यक्रमांची विचारपूस केली. वाचनालयांत असतांना "कोलंबो प्लॅन" या फोटो-चित्र-पुस्तकांत त्यांनीं आपण स्वतः तेथें सभेंत असल्याचें दाखविलें. वाचनालयाच्या उपयुक्ततेबद्दल व वाचनालयांतील वाङ्मयाचा संस्थेंतील प्रदर्शनांशीं कसा निकट संबंध आहे याचें विवेचन करण्यांत आलें. संग्रहालयें, वाचनालयें व शाळा या तीन शाखा राष्ट्रसंवर्धनाचे आधारस्तंभ आहेत असें अमेरिकन राष्ट्र मानितें व आजची समृद्ध अमेरिका त्यांचेमुळें निर्माण झाली आहे असें हें राष्ट्र प्रतिपादन करीत आहे. त्याप्रमाणें आपल्या देशाच्या संवर्धनांतहि संग्रहालयांना महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें पाहिजे, याकडे त्यांचें लक्ष वेधल्यावर ते म्हणालें कीं, पंचवार्षिक योजनेच्या ग्रंथावरून शिक्षण, उद्योगधंदे, वगैरे निरनिराळ्या खात्यांच्यासाठी निरनिराळीं पुस्तकें छापण्याची व्यवस्था होत आहे व संग्रहालयांस योग्य तें स्थान प्राप्त होईल. सौ. दुर्गाबाई म्हणाल्या कीं, अशा प्रकारचा संग्रहालय आपण मँच्युरियामध्यें पाहिला होता. परंतु, हिंदुस्थानांत कोठेंहि पाहिला नव्हता. तो पुण्यास प्रथमच पाहिला. पंचवार्षिक योजनेचे ग्रंथ संग्रहालयाच्या वाचनालयांत ठेवण्याबद्दल श्री. देशमुख ह्यांनीं सुचविलें.

पुणें येथें रहावयास आल्यावर श्री. देशमुख ह्यांनीं या संस्थेचे एक विश्वस्त व्हावें व या संस्थेच्या संवर्धनास मदत करावी अशी श्री. भा. वि. धारपुरे यांनीं त्यांस विनंति केली. या भेटींत व संग्रहालयीन मार्गदर्शक सहलींत अनेक लहानमोठ्या मुद्यांची चर्चा झाली असल्याकारणानें ही भेट या संस्थेच्या कामांत महत्त्वाची ठरणार आहे.

---

### धान्य-विक्रींत ०·८६०३% नुकसान

१९४७-४८ ते १९५१-५२ ह्या पांच वर्षांच्या मुदतींत मुंबई सरकारनें ३९६ कोटी रुपयांचें धान्य, साखर, जनावरांचें खाद्य इत्यादींची विक्री केली. त्यांत ०·८६०३% म्हणजे एक टक्क्यापेक्षाहि कमी तूट आली. ह्या ३ कोटी, ४० लक्ष रुपयांच्या तुटीचीं कारणें वहातुकींतील नुकसान, स्वच्छ करण्यांतील नुकसान, गळणें, आकसणें, खराबी, इत्यादि होत. राज्य सरकारला बाहेरून आयात मोठ्या प्रमाणावर करावी लागली आणि सहाजिकच वहातुकींत कांहीं मालाची तूट आली अथवा कांहीं माल नाश पावला. लोकांना देण्यापूर्वी धान्य स्वच्छ करणेंहि आवश्यक होतें आणि त्यांतच मुख्यतः खोट आली. चाळणींतून खाली पडलेल्या खराब मालाच्या विक्रींतून ५० लक्ष रुपये जमा झाले, ते वरील नुकसानीच्या आकड्यांत समाविष्ट नाहींत.

---

### राज्यसरकारांचीं नवीं कर्जें

जुलै, १९५२ च्या मध्याच्या सुमारास मद्रास, मुंबई, प. बंगाल, उत्तर प्रदेश आणि मध्यप्रदेश हीं राज्य-सरकारें कर्जें उभारतील असें समजतें. एकूण सुमारें १५ कोटी रुपयांचीं कर्जें मागितलीं जातील. व्याजाचा दर ४% व परतफेडीचें वर्ष १९६२ राहील अशी अपेक्षा आहे.

## आपला अन्नधान्याचा प्रश्न

(ले.—श्री. भा. म. काळे, एम्. ए., बी. टी., मुंबई, पृ. सं. ४२ किं. ८ आ. प्रकाशकः— बापट आणि कं., मुंबई नं. २)

सदरहू पुस्तिका, सामान्य वाचक, हायस्कूलचे व ट्रेनिंग संस्थांतील विद्यार्थी यांचेसाठीं लिहिली आहे असें लेखक आपल्या निवेदन व मुखपृष्ठ यावर लिहितात. तथापि तें सद्यःस्थितींत बहुजन समाजासाहि फार उपयुक्त होईल अशी आमची खात्री आहे. लेखकाचा उद्देश सफल होईलच.

या विषयाचें स्वरूप लेखकानें सुंदर, सुलभ व थोडक्यांत दाखविलें आहे. या प्रश्नाची ऐतिहासिक पार्श्वभूमि, इंग्रजांनीं केलेली उपेक्षा, ब्रह्मदेश व पाकिस्तान निर्मिति, व फाळणीनंतरचे आपल्या सरकारचे निरनिराळे प्रयत्न व सरकार, शेतकरी व जनता यांनीं काय करावें, हे आंकडे देऊन सुस्पष्ट व सुलभ पद्धतीनें लेखकानें दाखविले आहे. आशा आहे कीं, ही पुस्तिका वाचल्यानंतर वाचकाला या विषयाचा जास्त अभ्यास करण्याची इच्छा होईल.

लेखकाचा निस्पृहपणा व आपल्या लोकांचे दोष उघडपणें दाखविणेचा प्रयत्न उत्तम आहे. त्याचप्रमाणें तिसरें प्रकरण फारच महत्त्वाचें व विचारार्ह आहे. त्यांचा एक मुद्दा—कीं, "शेतीमालाला योग्य बाजारभाव न मिळणें व किंमतीपैकीं फारतर ५० टक्केच पैसा प्रत्यक्ष शेतकऱ्याच्या हातीं पडणें," फार फार महत्त्वाचा आहे, त्याकडे आम्ही जनतेचें व सरकारचें लक्ष वेधूं इच्छितों. ही परिस्थिति सुधारलीच पाहिजे व शेतकऱ्याला ७५–८० टक्के किंमत मिळालीच पाहिजे व मधल्यांचें लोण्याचा गोळा उपटणें बंद व्हायला पाहिजे, तरच शेतकऱ्याचें राहणीमान वाढेल.

हिंदुस्तानच्या अन्नधान्याच्या प्रश्नांत पाऊस हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे व तो एक सट्टाच आहे. वरुण राजाच्या लहरीवर सर्व अवलंबून राहतें. वेळेवर पाऊस पडल्यासच उत्तम पीक येतें. हा एक कच्चा दुवा आहे. महाराष्ट्रांत तरी लहान लहान धरणें बांधणें, व जंगलें वाढविणें जरूर आहे. त्याचप्रमाणें, राष्ट्रीय दृष्टीनें कोणचीं पिकें व किती काढावयाचीं हें सरकारनें ठरवून, तें अमलांत आणावयास पाहिजे.

प्रस्तुत लेखकाच्या दोन पुस्तिका प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांनीं जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर लहान लहान अनेक पुस्तिका प्रसिद्ध कराव्यात अशी त्यांना आग्रहाची विनंति आहे.

त्यांना एक लहानशी सूचना करावीशी वाटते. त्यांनीं पुस्तिकेच्या शेवटीं, तुलनात्मक अभ्यासासाठीं आकड्यांचे तक्ते द्यावेत. पुस्तकांतील आंकडे सुस्पष्ट होण्यासाठीं तक्त्यांची जरूरी आहे.

त्याचप्रमाणें सर्व आंकडे एका श्रेणींत यावेत, नाहींतर वाचकाचा गोंधळ होतो. पान ५ वरील आंकडे "दहा लक्ष" या श्रेणींत, पान ६ वरील आंकडे "सहस्र" श्रेणींत, पान ७ वरील आंकडे "लक्ष" श्रेणींत, पान २० वरील आंकडे "कोटी, लक्ष, सहस्र" या श्रेणींत असल्यामुळें, वाचकांचा बराच घोटाळा होतो. मला वाटतें, त्यांनीं "लक्ष" श्रेणींत सर्व आंकडे द्यावेत.

—ग. कृ. चि.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

## मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.

शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

## बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंडुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर

# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

## हेड ऑफिस : पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. बी. बी. वाळवेकर (अध्यक्ष) ||| श्री. के. पी. जोशी (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |

### एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर

### सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
} मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.